**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

साक्षीदाराचा पुढील उलटतपास शपथेवर सुरु
**प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस**

४२. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे यांनी वादी दत्तात्रय कुदळे यांच्या विरुध्द दाखल केलेल्या नि.दि.दावा क्र.३६३/२००६ यामध्ये मारुती गार्डे यांच्या तर्फे माझ्या वडीलांनीच मुखत्यार म्हणुन काम पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे हे त्यावेळी वृध्द व आजारी होते आणि म्हणुन माझे वडील त्यांच्या तर्फे त्या दाव्यात काम बघत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दाव्याचा निकाल हा मारुती गार्डे यांच्या बाजुने लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ ते २०११ या कालावधीत मी व माझ्या वडीलांनी सदरील दाव्यामध्ये मारुती गार्डे यांच्या वतीने सर्व धावपळ केली होती. हे म्हणणे खरे आहे की, तशी धावपळ आम्ही मारुती गार्डे हे वृध्द व आजारी असल्याने केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दाव्याच्या निकाला विरुध्द दत्तात्रय कुदळे यांनी अपील क्रमांक १२२/२०११ दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या अपीलाचे कामकाज देखील मारुती गार्डे यांच्या वतीने ते वृध्द व आजारी असल्याने मी व माझे वडीलच बघत होतो. हे म्हणणे खरे आहे की, अपीलाचा निर्णय मारुती गार्डे यांच्या विरुध्द लागला होता. साक्षीदार सांगतो की त्या अपीलाच्या निकालात नावे कुदळेंचीच ठेवली होती मात्र वहिवाट आमची होती. हे म्हणणे खरे आहे की, ती वहिवाट म्हणजेच मारुती गार्डे यांची होती आम्हा पिता पुत्रांची नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अपील क्रमांक १२२/२०११ च्या निकालावर कोणतेही अपील कुदळे यांनी केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तथापि, त्यावर मारुती रामा गार्डे यांनी मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपीलाच्या कामी देखील मारुती गार्डे यांच्या वृध्दपणामुळे तसेच आजारपणामुळे मी व माझ्या वडीलांनी त्यांच्या वतीने काम पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मारुती रामा गार्डे सन २०२० साली मयत झाल्यानंतर मा. उच्च न्यायालयात मी तसेच प्रतिवादी मंगल यांनी त्यांच्या वतीने त्यांचे वारस म्हणुन काम पाहण्या करिता स्वतंत्र अर्ज दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ ते २०२० या सबंध कालावधीत मारुती

गार्डे हे वैयक्तीकरित्या कोणत्याही न्यायालयीन प्रकरणात स्वतः काम करु शकले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना सदरील प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष हजर राहुन त्यातले कागदपत्र प्राप्त करणे, वकीलांना सुसंगत माहीती देणे, इत्यादी कामकाज स्वतः करणे शक्य नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे परावलंबी झाल्यामुळे त्यांना त्यांची कामे दुस-यांकडुन करुन घ्यावी लागत होती. हे म्हणणे खरे आहे की, या सबंध कालावधीत त्यांना न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहुन त्यांच्या बाजुने पक्ष मांडण्याची संधी असुनही ते तसे करु शकले नसते. हे म्हणणे खरे आहे की, तसे करण्याकरिता त्यांची क्षमताच नव्हती.

४३. हे म्हणणे खरे आहे की, वादी दत्तात्रय कुदळे हे मारुती गार्डे यांची पत्नी खाशीबाई यांचे बंधु होत. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयीन प्रकरणे दाखल होण्यापूर्वी वादीचे कुदळे कुटुंबीय नेहमीच खाशीबाई व मारुती यांच्या वैवाहिक जीवनात अडीअडचणीला धावुन येत असत. हे म्हणणे खरे आहे की, खाशीबाई यांच्या अंत्यविधीला तसेच सावडण्याच्या व दशक्रियेच्या विधीला मारुती गार्डे हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वादी कुदळे यांनी मारुती गार्डे यांना त्याकरिता हजर राहण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही मारुती यांना त्या कार्यक्रमांना जावु नये असे सांगितल्या मुळेच ते तेथे गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मारुती यांना काहीही कळत नव्हते आणि म्हणुन ते खाशीबाई यांच्या कार्यक्रमाला व अंत्यविधीला गेले नव्हते.

४४. मारुती गार्डे यांना निवृत्ती नंतर १५ लाख रुपये मिळाल्याचे मला माहित नाही. त्यांना त्यावेळी नक्की किती रक्कम मिळाली होती या बाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे यांची मुंबईला असलेली खोली विकली होती. हे म्हणणे खरे नाही की त्या विक्री व्यवहाराकरिता मी व माझ्या वडीलांनी पुढाकार घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की सदरील खोली सन २००५-२००६ या कालावधीत साधारणतः रक्कम

रुपये ७ लाख पन्नास हजाराला विकली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या वडीलांनी मारुती रामा गार्डे यांच्याशी केलेल्या व्यवहारांच्या मोबदल्याची रक्कम रुपये ३,५०,०००/- व रक्कम रुपये ८,५२,०००/- अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००५ ते २०२० या कालावधीत दरसाल रक्कम रुपये १ लाख या हिशोबाने मारुती गार्डे यांना एकुण १६ लाखाचे उत्पन्न मिळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरील उत्पन्न, मुंबई येथील खोलीचा विक्री व्यवहार व आम्हा पिता पुत्रांशी मारुती गार्डे यांचा झालेला व्यवहार व त्यातुन मिळालेले उत्पन्न यांचा विचार करता मारुती गार्डे यांच्या कडे एकुण रक्कम रुपये ४० ते ४५ लाख असावेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मते मारुती गार्डे यांना आर्थीक अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मते मारुती गार्डे यांचा सन २००५-२०२० या कालावधीतील भरणपोषणाचा, औषधोपचाराचा खर्च आम्हीच करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे यांच्या मृत्युसमयी त्यांच्या बॅंक खात्यात केवळ १ हजार रुपये शिल्लक होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना काहीऐक कळत नसल्याने आम्ही पिता पुत्रांनीच त्यांच्या रक्कमेचा अपहार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मारुती गार्डे यांची मुलगी, जावई व सासरची मंडळी सुशिक्षीत होते. हे म्हणणे खरे आहे, मारुती हे स्वतः मुंबईला वास्तव्याला असल्याने त्यांना अडाणी व अशिक्षीत लोकांचे पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्हा भावडांचे शिक्षणही जास्त झाले नसल्याने आमचे सुध्दा त्यांच्याशी पटत नव्हते.

४५. माझ्याकडे मुळ मृत्युपत्र अभिलेखावर दाखल केल्याबाबत मला सांगता येणार नाही. अभिलेखावर दाखल असलेल्या मृत्युसह संलग्नीत कागदपत्रे कोणत्या तारखेला प्राप्त केली या विषयी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी क्र.५७ वरील मृत्युपत्रासह संलग्नीत सर्वच उतारे हे दिनांक २३.०६.२००८ रोजीचे आहेत व मृत्युपत्रावरील तारीख १६.०५.२००८ अशी नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदरील उतारे कथीत मृत्युपत्र तयार करण्याच्या दिवशी त्यासह संलग्न नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे ज्या कुणी ते मृत्युपत्र तयार केले त्यावेळी त्यांच्याकडे मिळकतीचे

उतारे नव्हते व ते नसताना ते मृत्युपत्र तयार करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, या विसंगती बाबत चे स्पष्टीकरण मी माझ्या जबाबात दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत मृत्युपत्रासह संबंधीतांचे वैद्यकीय प्रमाणपत्र व त्यावरील विसंगती दर्शविणा-या तारखा याबाबतचे स्पष्टीकरण माझ्या जबाबात नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत वैद्यकीय प्रमाणपत्रावर मारुती गार्डे यांचा अंगठा किंवा सही नसल्याबाबतचे स्पष्टीकरण माझ्या जबाबात नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील मृत्युपत्राबाबतचे कामकाज माझ्या वडीलांनी केले असल्यामुळे मला त्याबाबत व्यक्तीशः माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मृत्युपत्राबाबत संपुर्ण माहीती न घेता मी साक्ष देत आहे.

४६. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व चुलते यांच्यात झालेल्या वाटपात माझे वडील यांना वाटपात ६ एकर ३ गुंठे व प्रत्येक चुलत्याला ४ एकर ५ गुंठे असे क्षेत्र आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांना चुलत्यांच्या तुलनेत जास्त क्षेत्र वाटपात देण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्हा पिता पुत्रांना पहिल्यापासुन जास्त मिळकत लाटण्याची सवय आहे. साक्षीदार सांगतो की माझे वडील शेती करायचे त्यामुळे त्यांना जास्त क्षेत्र वाटपात आले आहे. कथीत मृत्युपत्र त्यावरील नमुद तारखेच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालयात का नोंदविले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही व त्याबाबतचे स्पष्टीकरण माझ्या जबाबात नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत मृत्युपत्रात नमुद मिळकती मध्ये प्रतिवादी मंगल हिचा वारसा हक्काने कब्जा आहे. साक्षीदार स्वतहुन सांगतो की त्या संपुर्ण क्षेत्रावर प्रतिवादी मंगल हिचा कब्जा नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटया मृत्युपत्राच्या आधारे मारुती गार्डे यांच्या मिळकतींवर आम्ही अधिकार सांगण्याचा प्रयत्न करत आहे. दावा मिळकतीचा क्रमांक १३६९ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२० ते २०२५ या कालावधीत प्रतिवादी मंगल हिचाच कब्जा सदरील मिळकतीवर आहे. साक्षीदार सांगतो की त्यावर माझ्या चुलत्यांचा कब्जा आहे. हे

म्हणणे खरे नाही की, मी खोटे साक्ष शपथपत्र दिले आहे व खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.14 12:14:50 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- १३/११/२०२५ *दुसरे* सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.